# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

***December-2021   Volume-12   Issue-26***


*On*

# *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*


| Chief Editor | Editor |
| --- | --- |
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

EDITORIAL BOARD

| | | |
| --- | --- | --- |
| Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]<br>Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]<br>Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]<br>Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]<br>Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S] | gayen Kim Anh, [Hanoi] Virtnam<br>Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]<br>Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]<br>Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]<br>Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S] | Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]<br>Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]<br>Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]<br>Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]<br>Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G] |


**Published by-** Mr. Shashikant Jadhawar, I/C, Principal, Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | महात्मा ज्योतिवा फुले की शिक्षा नीति<br>डॉ. चंदा सोनकर | 1-3 |
| 2 | राजर्षि शाहू महाराज और आर्य समाज<br>डॉ. विनोदकुमार विलासराव वाय 'वेदार्य' | 4-6 |
| 3 | महात्मा फुले ,राजर्षी छत्रपती शाहू महाराज ,डॉ आंबेडकर यांनी मांडलेली सामाजिक , आर्थिक स्वातंत्र्याची संकल्पना<br>डॉ. श्रीनिवास भोंग | 7-9 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार<br>डॉ. अरूण चांगदेव खर्डे, कु. साडेकर राधिका गणेश | 10-11 |
| 5 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता<br>सा.प्रा.बी.एच.मगर | 12-15 |
| 6 | आंबेडकर की विचारधारा<br>Dr. Rajashekhar U Jadhav | 16-18 |
| 7 | महात्मा जोतीराव फुले यांची अभंग रचना<br>डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 19-23 |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार – एक अभ्यास<br>प्रा. डॉ. सुरेश वसंतराव खोंड | 24-26 |
| 9 | डॉ. भिमराव अंबेडकर के शिक्षा संबंधी विचार और कार्य<br>प्रा. डॉ. राजकुमार पंडितराव जाधव | 27-29 |
| 10 | माडिया आदिवासींच्या समस्या सोडविणारी एकमेव संस्था – लोकबिरादरी प्रकल्प<br>प्रा.संजय उत्तमराव उगेमुगे | 30-33 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>डॉ. चेतना दत्तात्रय जगताप | 34-36 |
| 12 | डॉ.राममनोहर लोहिया यांचे समाजवादाविषयीचे विचार<br>प्रा. डॉ.सिद्राम सलवदे | 37-40 |
| 13 | महात्मा फुले वाङ्मय व कार्य<br>विजयकुमार रामदास घोडके | 41-44 |
| 14 | उच्च शैक्षणिक ग्रंथालयासमोरील आव्हाने<br>प्रा. सरडे दिलीप निवृत्ती | 45-47 |
| 15 | सामाजिक क्रान्ति के प्रणेता महात्मा ज्योतिराव फूले<br>प्रो. डॉ. गायकवाड मुकुन्द | 48-49 |
| 16 | म. फुले यांनी शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या दुःखस्थिती विषयी मांडलेले विचार व त्याचा मराठी साहित्यावर झालेला परिणाम<br>प्रा. डॉ. चंदनशिव राजेश नारायण | 50-52 |
| 17 | अर्थतज्ञ: डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>डॉ. भागवत सुभाष गजधाने | 53-55 |


Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor- 7.265, ISSN- 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-26
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा जोतीराव फुले यांची अभंग रचना

डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे
मराठी विभागप्रमुख, मशिसे. गट–अ शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

प्रस्तावना :

महात्मा जोतीराव फुले हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारत देशातील द्रष्टे विचारवंत, कर्ते सुधारक व समाजक्रांतीचे जनक होत. जीवनातील प्रत्येक क्षेत्रातील त्यांचे विचार हे काळाच्या कितीतरी पुढे होते. शेती, उद्योग, शिक्षण, जातीनिर्मूलन, स्त्रियांचे प्रश्न, शुद्रादि अतिशूद्रांचे प्रश्न, जातीनिर्मूलन, वंचिताचे प्रश्न समाजसुधारणा या आणि इतर सर्वच क्षेत्रातील त्यांनी सुधारणासाठी साहित्य हे माध्यम उपयोगात आणले. साहित्यामधून फक्त त्यांनी प्रश्न मांडले नाही तर त्यांनी ते आपल्या कार्यातून सत्यात उतरविले.

महात्मा फुले यांची कथनी जितकी श्रेष्ठ होती, तितकीच 'करणी' देखील होती. म्हणून त्यांना कर्ते सुधारक म्हटले जाते, ते या अर्थानेच होय. त्यांचे सर्वच वाङ्मय स्वातंत्र्य, समता, बंधुता व मानवता या वैश्विक मूल्यांचा हिरारीने पुरस्कार करणारे आहे. जोतीरावांनी थॉमस पेन यांचा 'राइटस ऑफ मॅन' ग्रंथ, जॉर्ज वाशिंगटन, छत्रपती शिवाजी महाराज, नेपोलियन बोनापार्ट, यांचे चरित्र वाचले होते. या वाचनाने त्यांच्या पुढील कार्याला दिशा मिळाली. 'थॉमस पेन' यांचा 'राइट्स ऑफ मॅन' हा ग्रंथ त्यांच्या पुढील विचार आणि कार्यासाठी मैलाचा दगड ठरला. त्यांनी आपल्या साहित्यामधून सर्वकष समाजक्रांतीचे तत्त्वज्ञान मांडले. मात्र प्रस्थापितांनी त्यांच्या काही ग्रंथाना किंबहुना एकूणच साहित्याला जाणीवपूर्वक प्रकाशात आणले नाही किंबहुना येऊ दिले नाही असे म्हटले तर वावगे ठरू नये. जोतीराव फुल्यांची काव्यरचना त्यांच्या हयातीत व नंतरही उपेक्षित का राहिली या संदर्भात प्रभाकर वैद्य लिहितात, ''फुल्यांबद्दल आणि त्यांच्या लिखाणाबद्दल इतका अखंड बोलबाला सतत चालू असतो, पण जोतीबा नामक कोणी कवी होते त्यांनी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर जन्मभर काव्यरचना केलेली आहे. आपल्या दृष्टीने जोतीबा त्या रचनेला विशेष महत्त्व देत होते. या गोष्टीकडे त्यांच्या अनुयायांनी किंवा विद्वानांनीसुद्धा 'अगदी' संपूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. कवी म्हणून फुल्यांचे नाव अनुल्लेखाने पुसून टाकण्याच्या कामी, त्यांचे विरोधक–अनुयायी त्याचप्रमाणे विद्वान, संशोधक या सर्वांचेच व्यवहारतः तरी एकमत असलेले दिसते.'' एकूणच महात्मा जोतीराव फुले यांचे साहित्याची तर उपेक्षा झालीच त्यातही त्यांच्या काव्यसंपदेची प्रभाकर वैद्य म्हणतात त्याप्रमाणे शंभर टक्के उपेक्षा केली गेली.

महात्मा फुले यांच्या कवितेचा लेखनकाळ हा केशवसूतपूर्व आहे. १८१८ ला पेशवाईचा अस्त झाला. इंग्रजी राजवट सुरू झाली. पेशवाईचा अस्त ही फार मोठी राजकीय घडमोड होती. समाजातील मूल्यव्यवस्थाच बदलली गेली. परिवर्तनाची पहाट येणार असे वाटू लागले, मात्र हे सर्व फार कठीण होते. या संदर्भात शाहिर परशराम लिहितो,

''जुने कायदे अगदी मोडले जधीपुत झाली इंग्रेजी।''[१]

साधारण १८४० च्या दशकात पोवाडा आणि लावणी यांची जादू कमी झाली होती. सगणभाऊ (१९४०), परशराम (१८४४) हे नामांकित शाहीर मृत्यू पावले होते. मराठी साहित्य भाषांतराचे धडे गिरवत होते. प्रस्तुत काळ हा मराठी कवितेचा संक्रमण स्थितीत वाटचाल करीत होता. अशा काळात खऱ्या अर्थाने कवितेचे अंतरंग व बहिरंग या दोन्हीमध्ये बदल घडवून आणणारा समर्थ कवी म्हणजे महात्मा फुले होय. आधुनिक कवितेचा केशवसूतांपूर्वी भक्कमपणे पायाभरणी करणारे कवी म्हणून महात्मा फुले यांचा गौरव करावा लागतो. या संदर्भात यशवंत मनोहर लिहितात, ''आधुनिक कवितेचे जनक जर केशवसुत ठरत असतील तर आधुनिक काव्यक्रांतीचे अग्रदूत म्हणून, आधुनिक काव्यासाठी वैचारिक भूमी तयार करणारे कवी म्हणून जोतीबा फुल्यांचे कार्य टाकले जावू नये.''[२] केशसुतांनी १९८५ ला काव्यलेखनास सुरूवात केली. म्हणजे जोतीराव फुल्यांचे काव्यलेखन केशवसुतांच्या कितीतरी पूर्वी झाले हे निर्विवाद आहे. महात्मा फुले यांची कविता ही प्राचीन किंबहुना मध्ययुगीन रचनाप्रकार आणि आधुनिक जीवनदृष्टी याचा सुंदर संगम आहे.

महात्मा जोतीराव फुले यांचे काव्यलेखन :

१) छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पवाडा (१८६९)

२) 'ब्राह्मणांचे कसब' यामध्ये ७ अभंग आहेत तसेच प्रारंभीच १ अभंग आहे, असे एकूण १२ अभंग.

३) दस्यूचा पवाडा

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

४) भटकामगार इंजिनिअर खात्यात कशी पेंढारगर्दी करितात याविषयीचा पवाडा

५) अखंडादि काव्यरचना

६) याशिवाय आरत्या, आर्या, दिंडी आणि काही पद्यात्मक पत्रे असे त्यांचे काव्यलेखन आहे.

जोतीरावांच्या काव्यलेखनाचा विचार करण्यापूर्वी या काव्यलेखनाचा हेतू लक्षात घ्यावा लागेल. तत्कालीन मराठी कवी मंडळीत आपल्याला स्थान मिळावे, आपला नावलौकिक व्हावा, किंबहुना 'यशसे–अर्थकृते' यासाठी देखील त्यांनी काव्यरचना केली नाही. ''फुल्यांनी जी काव्यरचना केली ती आपल्या जीवनकार्याच्या सिद्धीसाठी ज्या हेतूने त्यांनी वाणी व लेखणी गद्यामध्ये अखंड झिजविली, त्याच हेतूने त्यांनी पद्यरचनाही केली. त्यांच्या इतर लिखाणाप्रमाणेच त्यांची काव्यरचनाही त्यांच्या एकूण जीवनाचा अंगभूत भाग होता.''[३] अर्थात महात्मा फुले यांनी एक जीवनव्यापी प्रेरणा घेवून कविता लिहिली. आत्मविष्काराची भावना असणे दुरापास्त होते. त्यांची वैचारिक भूमिका मांडणे हे एक प्रयोजन होते. मुख्यत्वे त्यांची जी सर्वव्यापी मानवता, समता–बंधुता व स्वातंत्र्य याच्याशी बांधिलकी साधणारी जी विचारप्रणाली होती, त्यामधून सम्यक परिवर्तन घडावे, जगात मानवतेची प्रतिष्ठापणा व्हावी या उदात्त हेतूंनी त्यांची कविता लिहिली. प्रभाकर वैद्य महात्मा फुले कवितेचे आणि संतांच्या कवितेचे अंतरिक नाते, त्यांच्या प्रेरणा याचा अन्वय शोधतात. ते म्हणतात, ''ज्ञानोबापासून तुकोबापर्यंत साऱ्या संत कवीचा जो हेतू होता, व त्यामागील जी प्रेरणा होती, तिच्याशी जोतीबाच्या अखंड काव्यरचनेचे नाते नक्की जुळण्यासारखे आहे.''[४] म्हणूनच महात्मा फुले यांना संत तुकोबाच्या धर्तीवर 'तुका म्हणे' ऐवजी 'ज्योती म्हणे' हे नामाभिधान वापरले. भले अशयात्मक वैद्यर्म्य असेल मात्र अभिव्यक्तीत बरेच साधर्म्य आहे.

अभंग आणि अखंड :

महात्मा फुले यांनी जी कविता लिहिली त्यामध्ये शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा, अभंग, अखंडरचना, ब्राह्मणाचे कसब व काही मंगलाष्टके यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांचे एकूण १९४ 'अखंड' उपलब्ध आहेत. महात्मा फुले यांनी प्रारंभी काही अभंगरचना केली. त्यांचे एकूण आज १२ अभंग उपलब्ध आहेत. साधारण १९८५ नंतर त्यांनी अखंड लिहिले. महात्मा फुले यांनी संताचा 'अभंग' हा रूपबंध जसे प्रारंभी स्वीकारला तरी त्याचा आशय हा अध्यात्मिक नसून लौकिक आहे. 'अभंग' हा शब्द (अ + भंग) ज्याचा कधीही भंग होत नाही असा होय. महात्मा फुले यांनी जे साहित्यप्रकार वापरले त्यामागे त्याला तात्त्विक व वैचारिक अधिष्ठान होते, एक व्यापक दृष्टी होती. अगदी अभंगाच्या बाबतीत जरी विचार केला तर काही गोष्टी पटकन नजरेत भरतात. अभंग छंद हा रचनासुलभ तसेच उच्चार सुलभ आहे. पाठांतरासाठी सोपा आहे, समाजात इतर रचनाप्रकारापेक्षा कितीतरी लोकप्रिय आहे. जनसामान्यात रूजलेला, रुळलेला आहे. हे महात्मा फुले यांनी पूर्णपणे जाणलेले होते. म्हणून जाणीवपूर्वक 'अभंग' या देशी छंदाची त्यांनी आपल्या रचनासाठी निवड केली. या संदर्भात प्रभाकर वैद्य लिहितात, '''अगदी सामान्यांतल्या सामान्य निरक्षर माणसाला, समाजातील अगदी शेवटल्या थरातील शेवटल्या माणसालासुद्धा समजेल, त्याच्या अंत:करणाला थेट जावून भिडेल इतकी त्याची रचना आणि भाषा सोपी होती. म्हणूनच केवळ फुल्यांना 'अभंग' हा पद्यप्रकार पसंत पडला असावा आणि म्हणूनच फुल्यांनी तो स्वीकारला आणि वापरला असावा.''[५]

जोतीराव फुले यांच्या साहित्याविषयी काही गोष्टी स्पष्ट होत नाहीत. त्या संदर्भात केवळ अनुमानच करावेलागते. प्रारंभी त्यांनी आपल्या रचनांना अभंग म्हटले व नंतर त्याला अभंग हे नाव दिले. याची काही संगती लावता येत नाही. या संदर्भातील यशवंत मनोहर यांचे विचार काही अंशी पटण्यासारखे आहेत ते म्हणतात, ''अभंग लेखनास पुढे अखंड हे नाव दिले यामागचे एक कारण तर स्पष्ट आहे की, जोतीबा फुले यांना काही कल्पना क्रमाने स्पष्ट होत चाललेल्या होत्या. आपले आपल्या व्यक्तिमत्वाचे, भावना विचारांचे आपल्या दृष्टिकोनाचे संताच्या भावविचाराच्या अनुषंगाने संभवणारे निराळेपण त्यांच्या क्रमाने स्पष्टपणे लक्षात येवू लागले.''[६]

महात्मा फुले, यांच्या साहित्याचा अभ्यास करणारे श्रीराम गुंदेकर यांच्या मते महात्मा फुले यांनी 'अभंग' ऐवजी अखंड ही संज्ञा पद्यरचनेसाठी हेतुत: किंबहुना जाणीवपूर्वक वापरलेली आहे. समाजजीवनात 'अभंग' या रचनाप्रकाराला अनन्यसाधारण महत्त्व होते आणि आजही आहे. हे जाणून देखील महात्मा फुले यांना अभंगाऐवजी 'अखंड' हे नाव द्यावे लागले याविषयी श्रीराम गुंदेकर लिहितात, ''अभंगाला चिकटलेले पारंपरिक अर्थ व संदर्भ आशयाला मारक ठरतील, अर्थाचा विपर्यास केला जाईल, संताच्या अभंगाप्रमाणे यांचीही देव्हाऱ्यावर पूजा होईल आणि कृतिप्रणवता या प्रयोजनावर पोतारा फिरेल अशी शक्यता त्यांना वाटली असावी. आपल्या समाजाला व्यक्तिपूजा, व्यक्तिमहात्म्य यांचे स्तोम माजवणे फार आवडते. यामुळे कृती टाळून नवी बुवाबाजी करण्याची सोय होते, ही शक्यताही जाणवली असावी.''[७] थोडक्यात अखंड म्हणजे ज्याचे खंडण होत नाही, खंडण करता येत नाही, ज्यामध्ये प्रवाहीतपणा आहे. अशी रचना म्हणजे 'अखंड' साधारण १८८५ च्या पूर्वी महात्मा फुले यांनी अभंगरचना केली व १८८५ नंतर 'अखंड' लिहिले.



Govt. College of Arts & Science * Aurangabad *
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

त्यांच्या काव्यरचनेचे किंवा पद्यलेखनाचे वर्गीकरण वेगळ्या पद्धतीने देता येईल. त्यामध्ये पोवाडे, अभंग—१२, अखंडादी काव्यरचना—१९४, स्फुटपद्यरचना —२७ आणि ब्राह्मणाचे कसब हे एक खंडकाव्य त्यामध्ये अंतर्भूत आहे.

अभंग रचना :

महात्मा जोतीराव फुले यांनी समाजाच्या दु:खाचे मूळ हे वर्णजातिस्त्रीदास्यव्यवस्थेत आहे हे पुरते ओळखले होते. याला ज्ञानाच्या प्रकाशमय जोतीनेच नाहीसे करता येईल. त्यासाठी समाजात जागृती होणे गरजेचे आहे. म्हणून त्यांनी आपली लेखणी चालविली. साहित्य हे माध्यम वापरले. प्रारंभी 'अभंग' हा समाजमान्य व रूढ रुळलेला हा रचनाप्रकार कामी आणला. मागे उल्लेख केल्याप्रमाणे इ. स. १८८५ पूर्वी ज्या रचना केल्या त्यांना 'अभंग' हे नाव दिले आहे. महात्मा फुले यांचे 'अभंग' व संताचे अभंग यातील वेगळेपण सांगताना श्रीराम गुंदेकर लिहितात, ''महात्मा फुले यांनी अभंग हा रूपबंध स्वीकारला असला तरी आशय पारंपरिक वेदान्ती किंवा अध्यात्मिक नाही. संतांना पारलोकिक सुखाची ओढ होती; निवृत्तीपर जीवनदृष्टी होती. संतांच्या अभंगात समाजाची दु:खे, वेदना, अन्याय, आक्रोश यांचे ध्वनी—प्रतिध्वनी उठले आहेत. माणसाची सुखदु:खे त्यांना दिसली. त्यांचे अंत:करणही हेलावले परंतु त्यांच्या निवृत्तिपर व पारलौकिक जीवन दृष्टीची मर्यादा आशयविषयाला पडली आहे. एवढेच नव्हे तर, वर्णजातिव्यवस्थेचे जोखडही ते झुगारू शकले नाहीत. व्यवस्थाशरण अशी त्यांची रचना आहे.''[८] महात्मा फुले यांच्या आणि संताच्या अभंगातील साम्यभेद पाहत असताना संताच्या रचनांची अभिव्यक्ती महात्मा फुले यांनी स्वीकारली. मात्र आशय आणि विषय यांमध्ये मुळात दोन्ही अभंगात फरक आहे.

महात्मा फुले यांच्या उपलब्ध एकूण १२ अभंगापैकी 'छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा यामध्ये शेवटी 'अभंगरचना' आहे. यामध्ये राणीच्या राज्यात सगळीकडे ब्राह्मणशाही कशी आहे याचे वर्णन करताना जोतीराव फुले म्हणतात,

''सत्ता तुझी राणीबाई। हिंदुस्थानी जागृत नाही।
चहूंकडे भटशाही। कुणब्याची दाद नाही
खेडेगावी कुळकर्णी। आहे लेखणीचा धणी।
जोती म्हणे धाव घेई। दुष्टापासोनी सोडवी।।''[९]

तत्कालीन ब्रिटिश साम्राज्यात कुणब्याची स्थिती हलाखीची आहे. भटशाहीमुळे कुणब्यांना न्याय मिळत नाही. भट—कुलकर्णी हे सर्व लेखणीचे मालक आहेत. भट—कुलकर्णी, मामलेदार मुजोर बनले आहेत हे आवाहन जोतीराव ब्रिटिश सम्राज्ञीला करतात. आर्यभट्ट हे कावा करून शूद्रांना फसवितात, धनद्रव्य लुबाडतात. अगदी अमानुष अवस्थेत जीवन जगणाऱ्या अतिशूद्रांसाठी काही चांगले करण्याची ब्राह्मण वर्गाची बिलकूल इच्छा नाही. उलट ते जमेल तेवढा त्रासच देतात. धर्म, वर्ण आणि जातिव्यवस्था यांचा आधार घेवून स्त्री शूद्रांचे सर्वकष शोषण केले.

ब्राह्मणापाठोपाठ 'मारवाडी' जातीतील समाजाने शुद्रातिशूद्र लोकांचे आर्थिक शोषण केले. हा समाज म्हणजे शुद्रातिशुद्र समाजाच्या आर्थिक परिस्थितीला लागलेला भुंगा होता. रिकाम्या हाती महाराष्ट्रात आलेली ही व्यापारी —सावकारी जात कमी काळात श्रीमंत झाली, त्याचे कारण म्हणजे व्याजामध्ये पैसा, दागिने, घर, भांडी, जनावरे, शेती इत्यादी घेवून त्यांनी संपत्ती वाढविली. यांनी शेतकऱ्यांना देशोधडीला लावले असे महात्मा फुले पोटतिडकीने सांगतात,

''कायापुरती लंगोटी। फिरती नांगराचे पाठी।।
एका घोंगड्यवाचूनी। स्त्रिया नसे दुजे शयनी।।
ढोरामागे सर्व काळ। पोरे फिरती रानोमाळ।।
ताककण्या पोटभरी। धन्य म्हणे संसारी।।[१०]''

शरीराला झाकण्यासाठी पुरेसा कपडा नाही. लंगोटोवर रात्रंदिवस नांगर हाकणारा शेतकरी,एका घोंघड्याचून दुसरे वस्त्र नाही, ढोरामागे मुले—मुली, रानोमाळ फिरतात, ताककण्या देखील त्यांना वेळेला मिळत नाहीत अशी स्थिती शेतकऱ्यांची होती. भिक्षूकवर्ग हा धर्माच्या नावाखाली द्रव्य—धन लुबाडून शेतकरी, गरीब शुद्रादिशुद्रांना कंगाल करीत होता. जे जोतीरावांनी जाणले होते. खोटे नाटे व्यवहार, ढोंग, कपटधर्मनतीती यावर जोतीरावांनी कडाडून हल्ला केला. भटांच्या मतलबी ग्रंथाच्या कसबाविषयी त्यांनी १७ चरणाचा अभंग लिहिला आहे. भट—ब्राह्मण सुखी, चैनी, विलासी जीवन जगतात. त्यांच्या या 'लीळा' एका चरणात सांगतात ते म्हणतात,

''स्नानसंध्या नित्य टिळाटोपीवरी। घेती मांडीवर जारीणीस।।
नेसोनि सोवळे विटाळसा झाला। शिवेना शुद्राला शुद्ध कैसा।।
शुद्राला भोजन दुरून वाढिती। मद्यपान घेती शाक्तमिसे।।
पाय धुववणी शुद्रा तीर्थ देती। मुखरस पिती यवनीचा।।[११]



Govt. College of Arts & Science * Aurangabad *
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

इंग्रजी राजवटीत सामाजिक, आर्थिक विषमतेत कळस गाठला होता. कष्टकऱ्यांचे जीवन दयनीय झाले. खालून ते वरपर्यंत सर्व नोकऱ्या ब्राह्मणांना मिळालेला होत्या. न्यायाधिश, मामलेदार, शिरस्तेदार, बेलीफ, इंजिनीअर, शिक्षक, शिक्षणाधिकारी, फौजदार, कारकून इत्यादी सर्व जागावर ब्राह्मणाची मक्तेदारी होती. त्यामुळे शुद्र शेतकऱ्यांवर प्रचंड अन्याय होत होता. या संदर्भात डॉ. अशोक चौसाळकर लिहितात, ''महात्मा जोतीराव फुले यांनी साम्राज्यशाही शोषण कसे होत होते यांचे चांगले विवेचन केले होते. भारतातील शेतकऱ्यांवर शेतसारा व इतर पट्ट्या लादून त्यांची लूट करणे, देशभर दुष्काळ असताना अन्न–धान्य व कच्चा माल यांची निर्यात करणे, पक्का माल आयात करून येथील कारागिरास कंगाल करणे.''[१२] असा अन्याय शेतकऱ्यांवर होत होता. याचे वर्णन महात्मा फुले करतात,

''लेपाच्या डबीत आंगमोड़ देई। झोप येत नाही। आळशास।।
दंव थबथबी शेती बांधावरी। बैलास चारी। शुक्रोदयी।।
ऊन–पाणी नित्य सोवळ्यचा थाट। संध्येसाठी पाट। मौन्यसुख।।
निटनेट करी गाड्या आऊतासी। तुटक्या दोरासी। चार घाली।।''[१३]

प्रस्तुत अभंगात तत्कालीन काळात विषमता कशी विकोपाला गेलेली होते, याचे चित्रण महात्मा फुले करतात. दोन आर्थिक स्तर आणि त्यातील प्रचंड विसंगती अगदी नेमकेपणाने येथे मांडली आहे. महात्मा फुले यांना समाजातील प्रश्नांविषयी प्रचंड आकलन होते. शेतकऱ्यांविषयी त्यांची लेखणी अधिक धारदार होते. निर्मिकाने अवयवबुद्धी मानवास समान दिलेली असताना ब्राह्मण सुखी कसा? शेतकरी, शुद्रादिशुद्र दुःखी कसा? असे प्रश्न ते व्यवस्थेला विचारतात व वाचकांना अंतर्मुख करतात. 'भटांचे कसब व शुद्राचा देवभोळेपणा' या विषयी त्यांचा एक अभंग आहे. ते म्हणतात,

''रडू लागे शेजाऱ्याशी। आसू नाही डोळे पुसी।।
मोल घेई रडू लागे। बहुरूपी आणि सोंगे।।''[१४]

भारतीय इतिहासात शुद्रादिशुद्रांचे, स्त्रियांचे जे शोषण होत आले आहे, ते धर्माच्या गारूडामुळे झाले. आर्यांनी अनार्यांना जिंकून घेतले व त्यांच्यावर अन्याय सुरू केला. धर्मसत्तेच्या मदतीने त्यांनी शुद्रांची विद्या बंद केली. मग शुद्र अज्ञान आणि अंधश्रद्धेत धर्मभोळेपणात गुरफुटून गेला. 'ब्राह्मणी कावा' हा शुद्रातिशुद्रांना समजत नसे. अज्ञानामुळे शुद्र कसा या कावेबाजपणाला बळी पडतो. त्यांचे नाटक किंवहुना नौटंकी कळण्याइतपत ज्ञान शुद्रांना आणि येथील स्त्रियांना नाही. मग ही मंडळी कुशलतेने दलाली करून अज्ञानी जनांना फसवितात हे महात्मा फुले यांनी कळवळीने सांगितले आहे. त्राता सर्वांना सारखा आहे तो कुणालाही परखा नाही म्हणून या ब्राह्मण दलालांवर बिलकूल विश्वास ठेवू नका; अशा मध्यस्थींची देवापर्यंत जाण्यासाठी आवश्यकता नाही, हे पावलोपावली ठणकावून सांगितले. 'सत्सार अंक–१' च्या आरंभी एका अभंगात आर्य कशी ढोंगी कृत्ये करीत आहे, त्यांचे धर्मप्रेम हे थोतांड असून कृत्रिम आहे हे सांगताना ते लिहितात,

''धूर्त आर्यांची मती खुंटली। रमा पंडिता बरी बाटली।।''[१५]

एकूणूच महात्मा फुले अभंग, अखंड व पोवाडा इत्यादी काव्यप्रकारातून आयुष्यभर लेखन करीत होते. शुद्रांना, स्त्रियांना ते 'विद्याशिका' म्हणून अगदी तळमळीने सांगत होते. 'आता तरी तुम्ही मागे घेऊ नका। धिक्कारूनी टाका। मनूमता। विद्या शिकताच पावाल ते सुख। घ्यावा माझा लेख। जोती म्हणे।।' विद्येमुळेच माणसांच्या अंगी शक्ती येते, आत्मविश्वास येतो ज्या व्यक्ती जीवनात यशस्वी झाल्या आहेत, त्यांनी विद्येचाच आश्रय घेतला आहे. 'विद्या शिकताच पावल ते सुख, घ्यावा माझा लेख' हा महात्मा फुले यांचा मंत्र आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका लढा व संघटित व्हा' हा मंत्र यातील साधर्म्य वेगळे सांगायला नको.महात्मा फुले यांच्या अभंगात आणि संत तुकारामाच्या अभंगात बरेच रचनेच्या किंबहुना अभिव्यक्तीच्या दृष्टीने कमालीचे साधर्म्य आहे हे गो.पु. देशपांडे यांनी (सत्यशोधक) नाटकांमधून, प्रभाकर वैद्य, श्रीराम गुंदेकर, नागनाथ कोत्तापल्ले आदि अभ्यासकांनी हे दाखवून दिले आहे. महात्मा फुले यांच्या विचारमंथनाचा केंद्रबिंदू हा 'सत्य' हा आहे. 'अखंड'मधून त्यांनी सत्याची खऱ्या अर्थाने हाक दिली आहे. या संदर्भात भालचंद्र फडके लिहितात, ''नामदेव–तुकोबाची अभंगवाणी बहुजन समाजाच्या काळजाला जावून थेट भिडणारी, या संतांची पारमार्थिक तळमळ जशी या अभंगवाणीतून आविष्कृत होत होती तशी त्यांची दंभ, ढोंग, बुवाबाजी, अंधश्रद्धा इत्यादी विषयी चीड अभंगातून व्यक्त होत होती.''[१६] अशाच प्रकारे जोतीराव फुले यांनी आपल्या अभंगातून ब्राह्मणांचा ढोंगपणा, संधीसाधूपणा, थोतांड, स्त्री व शुद्रातिशुद्र यांची फसवणूक करणाऱ्या भटशाहीविरुद्ध चीड व्यक्त केली आहे.

बाबा आढाव म्हणतात, मानवी बुद्धीचे स्वातंत्र्यप्रेम, समता, बंधुभाव, श्रमप्रतिष्ठा, सारासार विवेक या मूल्यांवर आधारलेला नव्या संस्कृतीचे उदगान फुल्यांनी केले आणि सामाजिक आर्थिक शोषण व्यवस्थेविरुद्ध सत्यशोधनाचे आंदोलन सुरु केले.''[१७] तर डॉ. गेल ऑम्व्हेट लिहितात, ''जुनी धार्मिक परंपरा संपूर्णपणे फेकून कष्ट करणाऱ्या जातीमध्ये असणारी बळीराजासारखी समतावादी परंपरा पुढे आणून नवीन



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-26
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

लुटविरहित समनाधारित, प्रेम व न्यायधिष्ठित समाजव्यवस्था आणण्याचे ध्येय.''[18] यासाठी त्यांची लेखणी काम करीत होती. तर भा. ल. भोळे म्हणतात, ''जन्मसिद्ध श्रेष्ठत्वाला जोतीरावांनी कडाडून विरोध केला आहे. 'जहाँ मर्दी–नामर्दी ही कधीही पिढीजादा नसते हे त्यांनी अनेक उदाहरणे देवून सिद्ध केले.''[19]

त्यांनी आपल्या अभंगातून सम्यक परिवर्तनवादी मानवमुक्तीचा विचार व्यक्त केला. शुद्ध ज्ञानोपासना, विज्ञाननिष्ठा व विवेकवादाचा पुरस्कार केला. आशयाच्या दृष्टीने महात्मा फुले यांच्या अभंगाची जातकुळी ही संताच्या अभंगापेक्षा मूलत: वेगळी आहे

थोडक्यात जोतीराव फुले यांनी प्रारंभी जे अभंग लिहिले त्या संदर्भात काहीएक विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे. त्यांचे भले १२ अभंग असतील त्याचे मोल कोणत्याही पठडीतील 'महाग्रंथापेक्षा' मोठे आहे. महात्मा जोतीराव फुले यांची कविता ही भारतीय समाजक्रांतीच्या जनकाची कविता आहे. प्राचीन काव्य आणि केशवसूतांचे काव्य यांना जोडणारा एक समर्थ दुवा म्हणून महात्मा फुले यांच्या कवितेकडे पाहता येईल.

संदर्भ सूची :

1. अदवंत म. ना. (संपा.), पैंजण, साहित्यप्रसार केंद्र सीताबर्डी, नागपूर, चौथी आवृत्ती, जुलै २०००, पृ. ८२
2. मनोहर यशवंत, संग्रामनायक जोतीराव फुले, सनय प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९ फेब्रुवारी २०२१, पृ. ८४
3. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा (प्रेरणा–शिकवण–विपर्यास) लोकवाङ्मय गृह, प्रथमावृत्ती ऑक्टो १९७४, पृ. २४६
4. तत्रैव, वैद्य प्रभाकर, पृ. २४६
5. तत्रैव, वैद्य प्रभाकर, पृ. २४८
6. तत्रैव, मनोहर यशवंत, पृ. ८८
7. गुंदेकर श्रीराम, महात्मा जोतीराव फुले : विचार आणि वाङ्मय भाग १ आणि २, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट १९९२, पृ. १७९
8. तत्रैव, पृ. १७३
9. महात्मा फुले समग्र वाङ्मय, (संपा.) कीर धनंजय, मालशे स. ग., १९६९, पृ. ३८
10. तत्रैव, पृ.
11. तत्रैव, महात्मा फुले समग्र वाङ्मय, पृ. ५२
12. चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङ्मय गृह, प्रथमावृत्ती, १९९०, पृ. ३०
13. तत्रैव, गुंदेकर श्रीराम,पृ. १७६
14. तत्रैव, पृ. १७७
15. तत्रैव, पृ. १७७
16. फडके भालचंद्र, डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. १३
17. तत्रैव, पृ. १४
18. गेल ऑम्व्हेट, जोतीबा फुले आणि स्त्री–मुक्तीचा विचार, लोकवाङ्मय गृह, प्रथमावृत्ती नोव्हे १९९०, पृ. ३२
19. भोळे भा. ल., जोतीरावाची समता संकल्पना, लोकवाङ्मय गृह, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९०, पृ. १७

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad